ISSN 2250-1215

# वनराई

विशेषांक

# शाश्वत जीवनशैली

## निसर्गाकडे चला

# अंतरंग

## शाश्वत जीवनशैली - निसर्गाकडे चला

### १ अनुभवसंपन्न चिंतन



- **गरज शाश्वत जीवनशैलीची...** १७
  डॉ. माधव गाडगीळ
- **शाश्वत विकासाचा प्रारंभ स्वतःपासूनच** २३
  डॉ. हेमा साने
- **लोकजीवनशैली** २८
  डॉ. प्रतिमा इंगोले
- **कृषिआधारित शाश्वत जीवनशैली** ३३
  अनंत भोयर
- **भारतीयांची बदलती जीवनशैली आणि त्याचे परिणाम** ४२
  डॉ. प्रा. सी. बी. सिंग


### २ संकल्पना व व्याप्ती


- **मार्क्सचा आणि एंगल्सचा निसर्गवाद** ५७
  डॉ. गुरुदास नूलकर
- **निसर्गपूरकतेची नवी समज** ६२
  डॉ. प्रियदर्शिनी कर्वे
- **व्यक्तिगत बदलातून सामाजिक बदल** ६९
  (जागरूक समुदायाद्वारे विकेंद्रित आणि शाश्वत विकास)
  अनिल परांजपे
- **शाश्वत'ता म्हणजे काय रे भाऊ?... एक अंतर्बाह्य दृष्टीकोन!** ७२
  भूषण पाटील


### ३ कृतिशील कार्यक्रम - अन्न


- **हरितक्रांतीकडून पोषणक्रांतीकडे** ८७
  प्रा. एम. एस. स्वामिनाथन
- **अन्नसुरक्षा, विषाक्त अन्न व पर्यायी उपाय** ९०
  डॉ. तारक काटे
- **शाश्वत जीवनशैलीत आहाराचे स्थान** ९६
  डॉ. निखिल मेहता

### ४ कृतिशील कार्यक्रम - वस्त्र


- **कपड्यांची शाश्वत फॅशन** १०३
  सई पवार
- **पर्यावरणस्नेही कापडनिर्मितीतून ग्रामीण उपजीविकेला बळकटी** १०८
  अनंथु
- **फॅशन जगाला वाचवू शकेल?** १११
  स्नेहल महाबळ


### ५ कृतिशील कार्यक्रम - निवारा


- **कृत्रिम रसायनविरहित जीवनशैली** – डॉ. प्रमोद मोघे ११५
- **विषमुक्त घरे व परिसर** – प्रज्ञा ठाकूर १२०
- **शाश्वत जीवनशैलीचा गृहप्रवेश : हरित इमारती** – अनघा परांजपे–पुरोहित १२५
- **घनकचऱ्याचं शाश्वत व्यवस्थापन** – डॉ. विष्णू श्रीमंगले १२८




६


## कृतिशील कार्यक्रम - आरोग्य

- आरोग्याचे पर्यावरणीय मार्ग १३५
  डॉ. भूषण पटवर्धन
- दिनचर्या-ऋतुचर्या - शाश्वत आरोग्याची गुरूकिल्ली १४४
  वैद्य पौर्णिमा कुलकर्णी
- जीवनशैलीजन्य आजार आणि व्यायाम १४९
  डॉ. दिलीप देवधर
- व्यायाम - जीवनातील महत्त्वपूर्ण आयाम १५४
  डॉ. यशपाल गोगटे

७

## कृतिशील कार्यक्रम - शिक्षण, रोजगार व दळणवळण

- खेड्यातलं सहज शिक्षण १६५
  रंजना बाजी
- नोकऱ्यांची फॅक्टरी, नव्हे नोकऱ्यांचे शेत ...तेही नैसर्गिक! १६९
  निरंजन उपासनी, भूषण पाटील
- 'महामार्ग' शाश्वत वाहतुकीचा १७४
  सुजित पटवर्धन



८

## जीवनसाधना - योगाभ्यास, निसर्गोपचार आणि विपश्यना

- तणावमुक्त, आरोग्यदायी जीवनशैलीचा योग' १९३
  डॉ. गीता अय्यंगार
- निसर्गोपचार - आपले स्वास्थ्य आपल्याच हाती १९९
  डॉ. अशोक झंवर
- विपश्यनेतून मनःस्वास्थ्य २०४
  सचिन नातू



९

## वैश्विक ते स्थानिक - अनोखी उदाहरणं

- शाश्वत आणि आनंददायी भूतान समजून घेताना.... २२१
  शारिक आझाद
- पर्यावरणस्नेही कुरीचीबा २२५
  प्रसाद सांडभोर
- आधुनिक सोयी-सुविधांचं आमिष नाकारणारं 'अमिश' २२६
  स्नेहल महाबळ
- हरित सोसायटीचा मान प्राप्त केलेली 'युथिका' २२७
  वृंदा गोडबोले
- स्वच्छ भारत पुरस्कारप्राप्त 'रोझलँड सोसायटी' २३१
  संतोष मस्कर

१०

## अधिक काही

- वाचलेच पाहिजे असे काही – अजित बर्जे २४४
- तुम्ही काय कराल? २४८





**डॉ. गुरुदास नूलकर** हे शाश्वत विकासाचे अभ्यासक असून 'सिम्बायोसीस आंतरराष्ट्रीय विद्यापीठा'मध्ये प्राध्यापक आहेत. ते 'इकॉलॉजिकल सोसायटी'चे विश्वस्त आहेत.


# मार्क्सचा आणि एंगल्सचा निसर्गवाद




आजच्या पर्यावरणीय समस्या कोणा एका राष्ट्राच्या नसून पृथ्वीवरील प्रत्येक माणसाच्या आहेत. शाश्वत विकासाला फक्त राजकीय बांधिलकी पुरेशी नसून नैतिक जबाबदारीने वागणेही तितकेच महत्त्वाचे आहे. निसर्गाचा उपभोग घेतानाही अशीच नैतिक जबाबदारी सांभाळली पाहिजे. आजपर्यंत राजकीय अर्थव्यवस्थेत आर्थिक वृद्धी श्रेष्ठ मानली गेली आणि त्यासाठी निसर्गातून बेलगाम उपसा केला गेला; पण आता मात्र या परिस्थितीवर तातडीनं नियंत्रण करण्याची वेळ आली आहे.

ऑक्सफर्ड शब्दकोशात 'इझम' या प्रत्ययाचा अर्थ असा दिला आहे : 'ism : distinctive practice, system or philosophy, typically a political ideology or an artistic movement.' एक वैशिष्ट्यपूर्ण राजकीय अथवा कलात्मक साधना, प्रणाली किंवा तत्त्वज्ञानाची शैली. एखाद्या विचारवंताच्या वैचारिक योगदानात जर निश्चित वेगळेपण आणि उपयुक्तता असेल; तरच त्याच्या नावापुढे ळीा जोडले जाते. इतिहासात काही थोड्याच व्यक्ती होऊन गेल्या; ज्यांच्या नावापुढे हा प्रत्यय लागला. अशा यादीत कार्ल मार्क्स या अवलियाचे नाव प्रकर्षाने येते. **'मार्क्सिझम' आणि 'मार्क्सिस्ट'** हे दोन शब्द असलेली शेकडो पुस्तके गुगलवर सहजगत्या सापडतात. औद्योगिक क्रांतीच्या काळातील मार्क्सचे सामाजिक, राजकीय आणि अर्थशास्त्रीय विचार इतके क्रांतिकारी होते की, त्यांच्यामागे इझम लागले नसते तरच नवल.

मार्क्सिझम म्हणजे केवळ कम्युनिस्ट विचारसरणी असे संकुचित समीकरण आज समाजात रूढ असल्याचे जाणवते. भांडवलशाही आणि कामगार समस्या या विषयांसंबंधी मार्क्सच्या विचारांवर सर्वाधिक विश्लेषण आणि साहित्य उपलब्ध असल्याने अशी समजूत होणे साहजिक आहे; पण त्याचे वैचारिक योगदान केवळ कम्युनिझमपुरतेच मर्यादित नव्हते. सामाजिक विषमता आणि पर्यावरणीय ऱ्हास यांचे नाते आणि औद्योगिकीकरणाचे निसर्गावर होणारे आघात या विषयांवरील मार्क्सचे विचार काळाच्या फार पुढे होते. साधारणपणे विसाव्या शतकात **'इकॉलॉजिकल'** म्हणजे पारिस्थितीकीय विचारसारणी प्रगत होत गेली असे मानले जाते. **'इकॉलॉजी'**या शास्त्राच्या आधारे मानवी विकासासाठी अर्थव्यवस्था, जीवशास्त्रे आणि भूशास्त्रे यांचा एकत्रित विचार केला जातो. पृथ्वीवरील ऊर्जा, पदार्थ, परिसंस्था आणि मानवी अर्थक्रिया यांच्यातील देवाणघेवाण यांचा हिशेब लावून शाश्वत मार्गाचा पाठपुरावा केला जातो. मार्क्सने अशा विचारसरणीचा वापर एकोणिसाव्या शतकात केला होता. शाश्वत विकासाच्या वादाची ठिणगी पडायला एकविसावे शतक उजाडले. आजही मार्क्सचे विचार लागू होत असल्याचे जाणवते.


कार्ल मार्क्स

पण मार्क्सच्या लेखनात 'इकॉलॉजी'हा शब्द कधी आला नाही; त्यामुळे त्या काळातील काही स्वघोषित हरित-समाजवादींच्या मते मार्क्सच्या विवेचनात निसर्गाचे स्थान गौण होते. किंबहुना मार्क्सचा **'प्रोमिथिअन'** दृष्टीकोन म्हणजे औद्योगिकीकरणाने निसर्गाचा मानवी उपभोग करून घेण्याचा पुरस्कार करणारा दृष्टीकोन असल्याचा काहींचा आरोप आहे. परंतु मार्क्सने निसर्गाबद्दल केलेल्या विचारांवर गेल्या काही दशकांत बराच अभ्यास झाला. यात मोठा वाटा प्राध्यापक जॉन बेलमी फोस्टर यांचा आहे. या विषयावर त्यांची तीन पुस्तके प्रकाशित झाली, ज्यांतून मार्क्सिझममधील निसर्गाचे स्थान जाणून घेता येते. माणूस आणि निसर्ग यांचे नाते, औद्योगिकीकरणातून निर्माण होत असलेला दुरावा आणि औद्योगिक शेती यांवरील मार्क्सचे विचार आजच्या परिस्थितीत किती चपखल लागू आहेत हे दिसून येते.

### मेटाबॉलीक रिफ्टचा सिद्धान्त

औद्योगिक क्रांतीच्या यशात मार्क्सने भांडवलदारांपेक्षा मजुरांच्या श्रमाला अधिक महत्त्व दिले. भांडवलशाहीतून होणाऱ्या नफ्यावरची त्याची टीका प्रसिद्ध आहे. त्यांच्या मते भांडवलदारांनी एकदा भांडवल घालून उद्योग मांडला की त्यातून नफा कमावण्याची जी क्षमता असते; ती मजुरांच्या श्रमांतून येते. असे असले; तरी त्यांचे वेतनमूल्य मात्र श्रमांच्या तुलनेने खूपच कमी असते. Subsistence wages, ज्यामुळे भांडवलदारांच्या खिशात नफा जातो; त्यामुळे हा नफा मजुरांच्या शोषणाचा दर्शक आहे असे परखड मत मार्क्सने व्यक्त केले, ज्यावर पुष्कळ टीका झाली; पण मानवी श्रम आणि निसर्ग यांचे नाते काय प्रकारचे आहे हा त्याचा विचार तितकासा सर्वज्ञात नाही. मार्क्स म्हणतो की, मानवी श्रमांचे निसर्गाशी देवाणघेवाणीचे नाते असते. याला मानव आणि निसर्ग यांतील चयापचय **(मेटॅबॉलिझम)** असे त्याने संबोधले आहे. हे कसे असते ते त्याच्या या परिच्छेदातून दिसते

Labour is, first of all, a process between man and nature, a process by which man, through his own actions, mediates, regulates and controls the metabolism between himself and nature. He confronts the materials of nature as a force of nature. He sets in motion the natural forces, which belong to his own body, his arms, legs, head and hands, in order to appropriate the materials of nature in a form adapted to his own needs. Through this movement, he acts upon external nature and changes it, and in this way he simultaneously changes his own nature. It (the labour process) is the universal condition for the metabolic interaction

between man and nature, the everlasting nature-imposed condition of human existence... मानवी श्रम ही एक प्रक्रिया असून त्याने माणूस आणि निसर्ग यांत चयापचय (मेटॅबॉलिझम) होत असते. यातून माणूस निसर्गातील संसाधने स्वतःच्या उपयोगासाठी वळवतो आणि निसर्गात बदल घडवत असतो. यामध्ये मानव आणि निसर्ग या दोघांनाही एकमेकांची गरज असते असा या वाक्याचा मथितार्थ.

पुढे मार्क्स म्हणतो की, श्रमिक मेटॅबॉलिझममधून होणारा बदल थोडका असतो आणि त्याचे परिणाम निसर्गाच्या आवाक्यात असतात; परंतु ऊर्जेच्या बळावर चालणाऱ्या औद्योगिक प्रक्रियेतून या चयापचयाला तडा जातो. याला मार्क्सने **'मेटॅबॉलीक रिफ्ट'** म्हटले. यामध्ये निसर्गाचा उपयोग मानवी उपयुक्ततेपुरता होतो आणि मानवाकडून निसर्गाला परतफेड होणे कमी होत जाते. औद्योगिक मानव आणि त्याचे निसर्गाशी बदलते नाते यांत मार्क्सला मेटॅबॉलीक रिफ्टची प्रचिती ठिकठिकाणी होत होती. नैसर्गिक संसाधनांचे बाजारीकरण, बेसुमार जंगलतोड, पाणी आणि हवा यांमधील प्रदूषण, निकृष्ट होत चाललेल्या परिसंस्था, जनावरांच्या प्रजातींचे लुप्त होणे या गोष्टींचा वेग औद्योगिक क्रांतीत वाढला होता. मार्क्सच्या मेटॅबॉलीक रिफ्टने मानव आणि निसर्ग यांतील दुरावा वाढत चालला होता. मुख्य म्हणजे निसर्गावरील आघात दृष्टीस येत नव्हते किंवा त्यांचे दूरचे परिणाम दिसत नव्हते. मार्क्सचे मित्र आणि सहकारी फ्रेडरीश एंगल्स याने याला 'materialist conception of nature' असे म्हटले होते.

मार्क्सला अशीच मेटॅबॉलीक रिफ्ट औद्योगिक शेतीतूनही दिसत होती. औद्योगिक क्रांतीच्या सुमारास लोकसंख्या झपाट्याने वाढत होती आणि अन्नसुरक्षेसाठी शेतीत मोठे बदल होत गेले. पारंपरिक पद्धतीची शेती जाऊन तीव्र शेती (intensive farming) चालू झाली होती. भांडवलदार आणि कंपन्या हे घटक शेतीत उतरले, रासायनिक खते आणि कीटकनाशके मोठ्या प्रमाणात तयार होऊ लागली आणि औद्योगिकीकरणातून शेतीला यंत्रसामग्री पुरवली जाऊ लागली. १८६२ मध्ये युस्तूस फॉन लिबीग नावाच्या जर्मन रसायनशास्त्रज्ञांचे एक पुस्तक प्रकाशित झाले. त्यांच्या प्रस्तावनेतून अशा प्रकारच्या शेतीवर त्यांनी टीका केली होती.

ते म्हणतात, अशा शेतीने शहरे अर्थनिर्मितीची केंद्रे पोसली जात आहेत. त्यासाठी शेतीच्या उत्पादनातून मातीतील पोषणद्रव्ये गावाकडून शहरात जातात. निसर्गात चक्री पद्धतीने पोषणद्रव्ये पुन्हा मातीत मिसळतात; पण ही पोषणद्रव्ये शहराकडून गावाला परत मिळत नाहीत, ती नदी–नाले यांतून समुद्रात जातात.

लिबीग म्हणतात, त्यामुळे तीव्र प्रकारच्या शेतीतून मातीमधल्या पोषणद्रव्यांची लूट केली जाते व शहरातील कचरा आणि सांडपाणी यांची समस्या वाढत जाते. त्या काळात इंग्लंड जगभरातून शेतीची उत्पादने आयात करत होता. लिबीग म्हणतात 'यामुळे इंग्लंड जागतिक लूट करत आहे. इंग्लंड जगाच्या एका भागातून पोषणद्रव्ये आयात करून दुसऱ्या भागात कचरा करत आहे.'

मार्क्सवर लिबीगच्या लेखनाचा मोठा प्रभाव पडला आणि औद्योगिक शेतीवर त्यांनी सडकून टीका केली. मार्क्सच्या मते मानवाला अन्नपुरवठा करण्याची पृथ्वीची क्षमता निरंतर आहे; पण भांडवलशाही पद्धतीच्या शेतीत अर्थनिर्मितीचा पाठपुरावा होतो आणि बाजारमागणीवर शेतीचे निर्णय घेतले जातात. निकटच्या फायद्यासाठी केलेली शेती शाश्वत नसते. मार्क्सच्या शब्दांत –

Moreover, all progress in capitalistic agriculture is a progress in the art, not only of robbing the labourer, but of robbing the soil; all progress in increasing the fertility of the soil for a given time, is a progress towards ruining the lasting sources of that fertility. The more a country starts its development on the foundation of modern industry, like the United States, for example, the more rapid is this process of destruction. Capitalist production, therefore, develops technology, and the combining together of various processes into a social whole, only by sapping the original sources of all wealth - the soil and the labourer.


भांडवलशाहीच्या सुखकर जीवनशैलीत गुरफटत चाललेल्या समाजाचा निसर्गाशी दुरावा कसा वाढत जातो हे मार्क्सच्या मेटॅबॉलीक रिफ्ट या सिद्धान्तात अचूक मांडले आहे. मार्क्सच्या मते अर्थनिर्मितीच्या प्रक्रियेत निसर्गावरील आघाताची जाणीव सहजगत्या होत नाही आणि कालांतराने या आघाताचे रूपांतर प्रलयात होते. आज भेडसावत असलेल्या जागतिक पर्यावरणीय समस्येतून या भाकिताची प्रचिती येते. ज्या काळात नैसर्गिक संसाधने विपुल होती, नैसर्गिक परिसंस्था ठीकठाक होत्या आणि चंगळवादी जीवनशैलीची सुरुवातही नव्हती; त्या काळात मार्क्सने इतके गहन विचार मांडले हे आश्चर्यच आहे. मार्क्सच्या आधीही या गोष्टींवर विचार झाला होता. अर्नेस्ट हेकेल आणि अलेक्झांडर हमबोल्ट या शास्त्रज्ञांनी इकॉलॉजीचा शब्दप्रयोग प्रथम केल्याचे मानले जाते; पण त्यांनी याचा उपयोग अर्थकारणात केला नव्हता. ॲडम स्मिथ, थॉमस माल्थस, जॉन स्तुअर्ट मील, देवीड रिकार्डो अशा अर्थतज्ज्ञांनी मर्यादित नैसर्गिक संसाधने आणि अर्थव्यवस्था यांवर विवेचन केले; पण निसर्गऱ्हास आणि सामाजिक प्रश्नांशी सांगड घालून अर्थव्यवस्थेसाठी विस्तृत विचार मार्क्सने मांडले.

### भांडवलशाही आणि निसर्ग

भांडवलशाही आणि विषमता यांवरील मार्क्सची टीका प्रसिद्ध आहेच; पण मार्क्सची पारिस्थितीकीय विचारधारा याला समांतर आहे हे मात्र तितके ज्ञात नाही. औद्योगिक प्रक्रियेत **'सरप्लस'** म्हणजे **'अतिरक्त'** उत्पादनाचा पाठपुरावा होतो आणि अतिरिक्त

उत्पादनाचा साठा पैशाच्या स्वरूपात केला जातो. मार्क्स म्हणतो की, अतिरिक्त उत्पादनाच्या निर्मितीत मानवी श्रम आणि नैसर्गिक संसाधने खर्ची पडतात; त्यामुळे भांडवलशाहीत अर्थनिर्मितीच्या हव्यासापोटी मर्यादित नैसर्गिक संसाधनांचा अपव्यय होत जातो. भांडवलशाहीच्या स्पर्धात्मक वातावरणात भांडवलदारांकडून संसाधनांचा ओरबाडा सुरू होतो; त्यामुळे भांडवलशाही हा शाश्वत विकासाचा मार्ग नाही असे त्याचे मत होते. आजच्या परिस्थितीत हे स्पष्ट दिसून येते. मोबाईल फोन्सची शेकडो नवीन मॉडेल्स दरवर्षी बाजारात येत आहेत. त्यांच्या उत्पादनात वीज पाणी हे घटक खर्च झालेले असतात आणि अनेक दुर्मीळ खनिजे वापरली जातात. नवीन मॉडेल बाजारात आल्यावर काही महिनेच वापरलेले जुने लाखो फोन कचऱ्यात जातात; पण मोबाईल फोनच्या उलाढालीत देशाची आर्थिक वृद्धी होते; त्यामुळे नैसर्गिक संसाधनांचा अपव्यय अर्थव्यवस्थेत अदृश्य राहतो.

मार्क्सने फ्रेडरीश एंगल्स याच्याबरोबर **'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो'** हा ग्रंथ तर लिहिलाच; शिवाय अनेक निबंधही लिहिले. एका निबंधात एंगल्स म्हणतात की, भांडवलदार नजीकच्या नफ्याचा पाठपुरावा करताना; आपल्या उत्पादनाने ग्राहकावर आणि निसर्गावर दूरगामी काय परिणाम होतील याचा विचार करत नाही. असे परिणाम सरकार आणि समाज यांच्या समस्या होऊन बसतात, भांडवलदारांच्या नाही. भांडवलशाहीत नैसर्गिक संसाधनांचे मूल्यांकन त्यांच्या विनिमय क्षमतेवर (on exchange value) होत असे म्हणजे त्या संसाधनांची बाजारमागणी आणि त्यांची नैसर्गिक उपलब्धता यांवर बाजारपेठेत किंमत ठरते. खनिजांची मागणी वाढत गेली की साठा कमी होत जातो आणि किंमत वाढत जाते. हा प्रकार खनिज तेल व्यवसायात स्पष्टपणे दिसून येतो; पण सगळ्याच संसाधनांचे असे घडत असते. मार्क्स म्हणतो की, बाजारव्यवस्थेत असे मूल्यांकन मानवी उपयुक्ततेनुसार होते आणि त्यात संसाधनांचे मूलभूत मूल्य (intrinsic value) याचा विचार नसतो. अशा मूल्यांकन पद्धतीत निसर्गाकडून भांडवलदाराला संसाधनांचा पुरवठा विनामूल्य होत असल्याचे मानले जाते यावर मार्क्स आणि एंगल्स यांचा आक्षेप होता. कच्च्या मालाची किंमत ही त्याच्या उत्खनन प्रक्रियेची असते, संसाधनांचे मूलभूत मूल्य त्यात नसते. हा विनामूल्य कच्चा माल खरेतर सार्वजनिक मालकीचा असतो; परंतु त्यापासून तयार झालेल्या वस्तूंची किंमत मात्र ग्राहकांना मोजावी लागते. अशा पद्धतीने होणारी अर्थनिर्मिती  ही विषमच असणार हे मार्क्सला पटले होते. मार्क्सने तीव्र प्रकारची शेती कशी शाश्वत नाही हे तर सांगितलेच; शिवाय resource extraction म्हणजे संसाधनांचा अवाजवी वापर यावर भांडवलशाहीमध्ये काहीच उपाय नाही असे म्हटले. तर त्याच्या कम्युनिस्ट विचारसरणीमध्ये तसे करता येईल; कारण त्या विचारसरणीमध्ये संसाधनांची खासगी मालकी (private property rights) नाही; तर सरकारी मालकी होती आणि सरकारला भावी पिढ्यांसाठी विचार करणे भाग होते. 'दास कापिताल' या ग्रंथाचे पहिले वाक्य आहे – The wealth of those societies in which the capitalist mode of production prevails, presents itself as 'an immense accumulation of commodities', its unit being a single commodity.


फ्रेडरीश एंगल्स

आज जगातील सर्वाधिक मोठ्या पन्नास कंपन्यांपैकी दहा कंपन्या नैसर्गिक संसाधनांच्या व्यवसायात आहेत. अशा व्यवसायात असलेल्या बहुतांश कंपन्यांची बाजारपेठेत एकाधिकारशाही (मोनोपोली) असते.

### शाश्वत अर्थव्यवस्थेचा विचार

संयुक्त राष्ट्रसंघ पर्यावरणीय उपक्रमाच्या (UNEP) 'World Commission on Environment and Development' या संस्थेन 1987 साली 'Our Common Future' या अहवालातून औपचारिकरीत्या शाश्वत विकासाची व्याख्या पहिल्यांदा मांडली. ही व्याख्या अशी – Sustainable development is development that meets the needs of the present without compromising the ability of future generations to meet their own needs. शाश्वत विकासाची ही व्याख्या आजही वापरात आहे. पृथ्वीवरील मर्यादित संसाधने ही आजच्या आणि भावी पिढ्यांसाठी आहेत हा विचार आधुनिक शाश्वत विकासाच्या विचारसरणीचा पाया आहे. मार्क्सने याच्याबद्दल १२८ वर्षांपूर्वी म्हणजे १८९४ साली लिहून ठेवले होते. त्याच्या शब्दांत Even an entire society, a nation, or all simultaneously existing societies taken together, are not owners of the earth. They are simply its possessors, its beneficiaries, and have to bequeath it in an improved state to succeeding generations as 'bonipatresfamilias' (good heads of the household).

सामाजिक विकास आणि नैसर्गिक परिसंस्था यांचे संवर्धन या दोन्ही गोष्टी भांडवलशाही आणि मुक्त बाजारपेठ अर्थव्यवस्था यांतून साधल्या जाणार नाहीत यावर मार्क्स आणि एंगल्स ठाम होते. अशा अर्थव्यवस्थेत संसाधनांचा विषम वाटप होतो; ज्यामुळे

समाजातील आर्थिक विषमता वाढते आणि सामाजिक स्वास्थ्य बिघडते याचा प्रत्यक्ष अनुभव त्यांनी घेतला होता. मँचेस्टर या औद्योगिक शहरात एंगल्स यांनी काही वर्षे वास्तव्य केले. इथे त्यांना औद्योगिक शहराच्या समस्या जवळून पाहायला मिळाल्या. मँचेस्टरप्रमाणे फिलाडेल्फिया, शिकागो, डेट्रोईट, लंडन, लिवरपूल अशी औद्योगिक शहरे मोठी होत चालली होती. इथल्या संधींकडे आकर्षित होऊन छोटे शेतकरी आपले गाव सोडून येत होते. या मजुरांचे शहरी जीवन कसे होते ते 'The Condition of the Working Class in England' या पुस्तकातून एंगल्सनी मांडले. अल्प वेतनावर मजुरी करणाऱ्या स्थलांतरित जनतेला शहरात झोपडपट्टीतून वास्तव्य करावे लागले. अस्वच्छ परिस्थितीत दाटीवाटीने राहणाऱ्या मजुरांमध्ये रोगराई पसरत होती. विखुरलेल्या कुटुंबांतून असंतोष होता, असमाधानी वातावरण होते आणि गुन्हेगारी वाढत चालली होती. एंगल्सच्या शब्दांत – Such is the Old Town of Manchester... and such a district exists in the heart of the second city of England... if anyone wishes to see how little space a human being can move, how little air he can breathe, how little of civilization he may share, the frightful condition of this Hell upon Earth. Everything here arouses horror and indignation is of recent origin, belongs to the industrial epoch.

मार्क्स आणि एंगल्स यांच्या मते औद्योगिकीकरणाच्या रेट्यात वाढणारी शहरे अशाश्वत होती. फ्रेंच राज्यक्रांतीचा अनुभव त्यांना सांगत होता की; वंचित समाजाचा उद्रेक झाला; तर उठाव होतील. मुक्त बाजारपेठ आणि भांडवलशाही यांतून उद्भवणाऱ्या समस्या म्हणजे दारिद्र्य आणि युद्ध या आहेत असे त्यांचे मत होते आणि औद्योगिकीकरणातून युद्धसामग्री आणि लढाईचे तंत्रज्ञान यांत खरेच झपाट्याने वाढ होत राहिली. पहिल्या महायुद्धाचे रौद्र स्वरूप हे औद्योगिकीकारणाने बहाल केलेले होते.

### औद्योगिक उत्पादन आणि निसर्ग

औद्योगिकीकरणात आर्थिक वृद्धीला कोणतीही नैसर्गिक मर्यादा असल्याचे मानले जात नाही ही मार्क्सची खंत होती. अर्थव्यवस्थेतून तयार झालेला पैसा अर्थव्यवस्थेत चक्राकार पद्धतीने फिरून त्यात वृद्धी होत जाते; परंतु उत्पादनात वापरलेल्या नैसर्गिक संसाधनांचा प्रवाह मात्र चक्राकार नसतो. त्यामुळे एकदा संसाधनांचे उत्खनन झाले की त्याची उणीव निसर्गात कोणत्यातरी स्वरूपात राहते. पृथ्वीवरच्या नैसर्गिक परिसंस्था क्लिष्ट आहेत हे मार्क्सला ज्ञात होते. निसर्गाच्या जैविक आणि अजैविक घटकांत सतत देवाणघेवाण चालू असते. ही एक विकट अनोन्य क्रिया आहे; ज्यामुळे निसर्गात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप केला, तर त्याचे दूरगामी परिणाम काय होतील हे वर्तवणे आपल्याला शक्य होणार नाही असा इशारा मार्क्स आणि एंगल्स यांनी दिला होता. निसर्गावर आघात करूनच तंत्रज्ञानातील प्रगती होत असते अन् निसर्ग या आघाताला कसा प्रतिसाद देईल हे सांगता येणार नाही. याचा अतिरेक झाला; तर निसर्ग आपला रोष सजीव सृष्टीवर काढेल. याला एंगल्सने 'revenge of nature' असे म्हटले; त्यामुळे तांत्रिक प्रगतीवर उगीचच स्वतःची पाठ थोपटून घेण्याची गरज नाही असे तो म्हणतो.

समाज आणि निसर्ग यांच्या संबंधांविषयी कार्ल मार्क्स आणि फ्रेडरीश एंगल्स यांचे विचार गहन आणि प्रगल्भ होते; पण दुर्दैवाने ते दुर्लक्षित राहिले आणि त्यांचे समाजवादी विचारच प्रसिद्ध झाले. त्यांचा इकॉलॉजिकल विचार निश्चितच व्यापक नव्हता; किंबहुना त्यांचे विचार शाश्वत वाटचालीत नक्कीच परिपूर्ण नाहीत. मार्क्सने ऊर्जा आणि उष्मागतिशास्त्र (thermo dynamics) यांचा विचार औद्योगिकीकरणात केला नाही अशीही टीका केली जाते; परंतु त्याचे विचार म्हणजे आजच्या शाश्वत विकासाच्या पाठपुराव्याचा आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या **'सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स'**चा पाया आहेत असे म्हणता येईल. भांडवलशाही पद्धतीने निसर्गाचा उपभोग घेताना सामाजिक समता राहणार नाही आणि पर्यावरणीय ऱ्हास अटळ असेल असे मार्क्सने त्या काळात दाखवून दिले. त्याची प्रचिती आज येत आहे. आर्थिक वृद्धी हेच एक ध्येय मानून आपण चाललो नसतो; तर जागतिक पातळीवर आज ज्या समस्या भेडसावत आहेत, त्या कदाचित उद्भवल्या नसत्या किंवा त्या आपल्या आवाक्यात असत्या.

मार्क्सनंतर अनेक विचारवंतांनी इकॉलॉजिकल विचारसरणी अर्थव्यवस्थेत गुंफून हा विचार पुढे नेला. यामध्ये महात्मा गांधींचे योगदान खूप मोठे आहे; पण मार्क्सच्या समाजवादी विचारांचे जे झाले, तेच गांधीजींच्या राजकीय विचारांचे झाले आणि त्यांची इकॉलॉजिकल विचारसरणी तशी अज्ञातच राहिली. जोसेफ चेरियन कुमारप्पा यांनी गांधीजींच्या या विचारांना प्रसिद्धी दिली आणि पुढे अर्नेस्ट एफ. शुमाकर यांनी यात भर घातली.

शाश्वत विकासाचा विचार काही नवा नाही; परंतु प्रश्न असा पडतो की, इतक्या दिग्गज विचारवंतांचे योगदान लाभले असताना इतकी वर्षे माणसाने पर्यावरणीय समस्यांकडे कानाडोळा का केला? आणि आज या समस्या व त्यांची कारणे सिद्ध झाली असताना आपण अर्थकारणात आमूलाग्र बदल करू शकू का? का आपल्या पुढच्या पिढीलाही हेच प्रश्न पडतील? आजच्या पर्यावरणीय समस्या कोणा एका राष्ट्राच्या नसून त्या पृथ्वीवरील प्रत्येक माणसाच्या आहेत. शाश्वत विकासाला फक्त राजकीय बांधिलकी पुरेशी नाही. यासाठी नैतिक जबाबदारीने वागणेही तितकेच महत्त्वाचे आहे आणि निसर्गाचा उपभोग घेतानाही अशीच नैतिक जबाबदारी सांभाळली पाहिजे. आजपर्यंत राजकीय अर्थव्यवस्थेत आर्थिक वृद्धी श्रेष्ठ मानली गेली आणि त्यासाठी निसर्गातून बेलगाम उपसा केला खरा; पण आता तत्काळ नियंत्रण करण्याची आणि मेटॅबॉलीक रिफ्टला आळा घालण्याची वेळ आली आहे. असे केले नाही; तर एंगल्सच्या 'revenge of nature'ला सामोरे जावे लागेल.

**संपर्क – gurudasn@gmail.com**

वनराई

www.vanarai.org

# पर्यावरण आणि ग्राम विकास समर्पित मासिक

१९९० पासून 'वनराई' नावाने मराठी मासिक अंकाचे व दिवाळीच्या निमित्ताने वार्षिक विशेषांकाचे प्रकाशन

शेती, जल-मृदा संवर्धन, वनीकरण, पर्यावरण व ग्राम विकास समर्पित अग्रगण्य मराठी नियतकालिक म्हणून लौकिक



नामवंत अभ्यासक, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तज्ज्ञ, ज्येष्ठ पत्रकार, विचारवंत यांसह संवेदनशील तरुण, संशोधक इत्यादींकडून 'वनराई' अंकासाठी नियमित लेखन


महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील प्रगत शेतकरी, सामाजिक-पर्यावरणवादी कार्यकर्ते, अभ्यासू नेते, प्रशासकीय अधिकारी व स्पर्धा परीक्षांचे विद्यार्थी असा विविध प्रकारचा वाचक वर्ग

संशोधन-प्रशिक्षण संस्था, विद्यापीठ-महाविद्यालये व सार्वजनिक ग्रंथालय पातळीवरही विलक्षण प्रतिसाद

'इंटरनॅशनल स्टँडर्ड सीरिअल नंबर'प्राप्त (ISSN २२५०-१२१५) 'वनराई' मासिकाला प्रतिष्ठेचे वीसहून अधिक पुरस्कार

वनराई मासिकाचे सभासद, लेखक, जाहिरातदार, प्रायोजक होऊन आपणही 'वनराई'सोबत जोडून घेऊ शकता.






## वनराई मासिकाचे सभासद शुल्क असे भरा!

### डिमांड ड्राफ्ट/धनादेशाद्वारे सभासद शुल्क पाठविण्यासाठी तपशील

डिमांड ड्राफ्ट नं /चेक नं...........................
दिनांक ............................................
बँकेच नाव .......................................
(डिमांड ड्राफ्ट किंवा धनादेश 'वनराई' या नावाने खालील पत्त्यावर पाठवावा)
पत्ता :- वनराई कार्यालय, ४९८ पर्वती,
आदित्य रेसिडन्सी, मित्र मंडळ चौक, पुणे-४११००९.
ई-मेल :- editor@vanarai.org

### बँक खात्यात सभासद शुल्क जमा करण्यासाठी बँकेचा तपशील

खातेदाराचे नाव :- वनराई
बँकेचे नाव व शाखा :- बँक ऑफ बडोदा, सदाशिव पेठ, पुणे - ३०.
खाते क्रमांक :- ०४५००१०००१२६७८.
आय. एफ. एस. सी. कोड :- BARB0SADASH
(पाचव्या क्रमांकाचे अक्षर शून्य आहे.)
टीप:- बँक खात्यात जमा केलेल्या रकमेच्या पावतीची (झेरॉक्स) प्रत फॅक्स/ई-मेल/पोस्ट/कुरिअरने वनराई कार्यालयात पाठवावी.

### सभासद शुल्क

वार्षिक (प्रिंट)- ४००/-, पीडीएफ आवृत्ती (वार्षिक) - २००/-
त्रैवार्षिक - ११५०/-, पंचवार्षिक - १९००/-

संपर्क : वनराई, आदित्य रेसिडेन्सी, ४९८, मित्र मंडळ चौक, पर्वती, पुणे - ४११००९
७७२००५६७३८ editor@vanarai.org www.vanarai.org